www.arambhmarathi.com
arambhmarathi535@gmail.com

दैनिक
# आरंभ मराठी
DAILY ARMBH MARATHI

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले वा ■ अंक 248 ■ गुरूवार, दि. 31 ऑक्टोबर 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 4 ■ किंमत रू. 5



## झेंडू बहरला, फुलांना सोन्याचे दिवस

दारावरचे तोरण बांधण्यासाठी आणि घरातील सजावटीसाठी खास मागणी असलेल्या झेंडूच्या फुलांचे मळेही बहरून गेले आहेत. यावर्षी जिल्ह्यात जोरदार पावसाने झेंडूच्या शेतीचे नुकसान झाले.परिणामी दसऱ्याला झेंडू महाग झाला होता.आता दिवाळीलाही झेंडूला सोन्याचे दिवस येतील, असा अंदाज व्यक्त होत आहे. धाराशिव तालुक्यातील गोपाळवाडी शिवारात बहरलेली झेंडूची शेती. छायाचित्र: आरिफ शेख

# चारही मतदारसंघात बंडखोरांचा ताप

## बंडोबांना थंड करण्यातच युती व आघाडीची दिवाळी जाणार

## चार मतदारसंघात १६४ उमेदवारांचे २२३ उमेदवारी अर्ज

**आरंभ मराठी । धाराशिव**

विधानसभा निवडणुकीमध्ये खरी रंगत आली असून युती आणि आघाडीसमोर चारही मतदार संघात बंडखोरी शमवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. बंडखोरांना शांत करण्यातच प्रमुख राजकीय पक्षांची दिवाळी जाणार असून पुढील चार दिवस प्रमुख पक्ष आणि उमेदवारांसाठी कसोटीचे असणार आहेत. चार मतदार संघातील सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी प्रक्रिया बुधवारी पार पडली. शेवटच्या दिवसापर्यंत जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात १८५ उमेदवारांनी २७१ नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. यापैकी चार विधानसभा मतदारसंघातून १६४ उमेदवारांचे २२३ नामनिर्देशनपत्र वैध तर ४८ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहेत. तीन-तीन पक्षांची युती आणि आघाडी असतानाही चारही मतदारसंघात बंडखोरी झाल्याचे चित्र दिसत आहे.



उमरगा विधानसभा मतदारसंघातून ३२ उमेदवारांच्या ४३ नामनिर्देशन पत्रापैकी ३४ नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहेत. तर ९ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे. प्राप्त नामनिर्देशनपत्रामध्ये २८ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे. ४ नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहे. उमरगा येथून सातलींग स्वामी यांना तिकीट मिळेल असे वाटत असतानाच अचानक प्रवीण स्वामी यांचे नाव जाहीर झाले. त्यामुळे सातलींग स्वामी, कैलास शिंदे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उमरगा येथे आघाडीत बिघाडी झाली असून त्याला शांत करण्याचे आव्हान असणार आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ५४ उमेदवारांनी ८७ नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. यापैकी ७७ नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. तर १० नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे.वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची संख्या ५१ इतकी आहे तर ३ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत. तुळजापूर येथून नाराज झालेल्या मधुकरराव चव्हाण यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. आणि हा अर्ज कुठल्याही परिस्थितीत मागे घेतला जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे.

जीवनराव गोरे यांनाही राष्ट्रवादी पक्षाकडून अधिकृत अर्ज दाखल केल्यामुळे तिथेही पेच निर्माण झाला आहे. अशोक जगदाळे आणि ॲड. व्यंकटराव गुंड यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात ५० उमेदवारांनी ७१ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५५ नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहेत.तर १६ उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत.वैधरित्या नामनिर्देशित झालेले ४३ उमेदवार असून ७ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत. या ठिकाणी माजी नगराध्यक्ष नंदुराजे निंबाळकर, प्रतापसिंह पाटील, सुधीर पाटील, नितीन लांडगे, संजय निंबाळकर, सुरज साळुंखे, शिवाजी कापसे यासारख्या मातब्बर नेत्यांनी अर्ज दाखल केले आहेत.

परंडा विधानसभा मतदार संघात ४९ उमेदवारांनी ७० नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ५७ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. तर १३ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहेत. यातील ४२ उमेदवार हे वैधरित्या नामनिर्देशित झाले आहेत तर ७ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत. या ठिकाणी आघाडीत बिघाडी झाली असून शिवसेना (उबाठा) पक्षाने रणजित पाटील यांना तर राष्ट्रवादी पक्षाने राहुल मोटे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. डॉ. तानाजीराव सावंत यांच्यासमोर कोणता उमेदवार फायनल होतो हे ४ तारखे नंतरच कळणार आहे.

### ऐन दिवाळीत करावी लागणार मनधरणी

चारही मतदार संघात दोन्ही बाजूंनी बंडखोरी झालेली आहे. त्यामुळे पुढच्या चार दिवसात म्हणजे ऐन दिवाळीतच बंडखोरी थंड करण्याचे मोठे आव्हान प्रमुख पक्ष आणि उमेदवारासमोर असणार आहे. पुढील चार दिवसात कशी सूत्रे हलतात आणि कोण अर्ज माघारी घेतो यावर मतदार संघातील चित्र स्पष्ट होणार आहे.

### जरांगे पाटलांच्या भूमिकेकडे लक्ष

मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाने चारही मतदारसंघात पन्नास पेक्षा अधिक अर्ज दाखल करण्यात आले आहेत. जरांगे पाटील यांनी अजूनही निवडणुकीच्या संदर्भात भूमिका स्पष्ट केली नसली तरी पुढच्या दोन दिवसात त्यांना निवडणूक लढवायची की नाही याबद्दल अंतिम निर्णय घ्यावा लागणार आहे. जरांगे पाटील यांनी एक उमेदवार निवडला तर बाकीच्यांना उमेदवार अर्ज माघारी घ्यावा लागेल. सध्या तरी बंडखोरांना जरांगे पाटील हा एकच आधार वाटत आहे. पुढील चार दिवसात किती जणांचे बंड थंड होणार आणि किती जण मैदानात उतरून दंड थोपटणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### विक्रमी अर्ज दाखल

शेवटच्या दिवशी २९ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघातून १८५ उमेदवारांनी २७१ नामनिर्देशनपत्र दाखल केले. यामध्ये उमरगा विधानसभा मतदारसंघातून ३२ उमेदवारांनी ४३, तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून ५४ उमेदवारांनी ८७, उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातून ५० उमेदवारांनी ७१ आणि परंडा विधानसभा मतदारसंघातून ४९ उमेदवारांनी ७० नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.

# अवैध मद्य विरोधी १० छापे ; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्हा पोलीस प्रशासनाने गावठी दारू विरोधात मोहीम तीव्र केली असून, गेल्या दहा दिवसापासून दररोज वेगवेगळ्या भागात छापे टाकून गावठी दारू तसेच दारू निर्मितीचे साहित्य जप्त केले जात आहे.पोलीस अधीक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या आदेशावरुन मंगळवारी (दि.२९) रोजी अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी एकूण १० कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेला गावठी दारु निर्मीतीचा सुमारे ३,६०० लि. द्रव नाशवंत असल्याने तो जागीच ओतून नष्ट करण्यात आला तर सुमारे ८४२ लिटर गावठी दारु,५० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव व देशी- विदेशी दारुच्या एकुण १५० बाटल्या असे मद्य जप्त केले. ओतून दिलेला मद्यार्क निर्मीतीचा द्रव व जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे २ लाख ६७ हजार ९२० रुपये आहे. यावरुन १० व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत नळदुर्ग, लोहारा, ढोकी,धाराशिव शहर, धाराशिव ग्रामीण, तुळजापूर, बेंबळी, परंडा या पोलीस ठाण्यात दहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# गावठी पिस्तुल व तलवारीसह दोन आरोपी ताब्यात



**आरंभ मराठी । धाराशिव**

गावठी पिस्तुल आणि तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पळसप येथून ताब्यात घेतले. पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करणे व मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस पेट्रोलिंग करत आहेत. धाराशिव जिल्ह्यात दिनांक २९ ऑक्टोबर रोजी पेट्रोलिंग करत असताना, पथकास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे पळसप पारधी पिडी येथे राहणारा आकाश उर्फ तोब्या मधुकर पवार (वय २४ वर्षे, रा. पळसप,पारधी पिडी) याच्याकडे एक गावठी कट्टा विनापास परवाना बेकायदेशीररित्या कब्ज्यात बाळगलेला असुन तो सध्या लातुर कडून कळंब कडे येत आहे अशी खत्रीशीर माहिती मिळाली. यावरून पथकाने घारगाव जवळ असलेल्या एसटी पॉईंट जवळ सापळा लावून आरोपीस ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने सांगितले की, सदरचा गावठी कट्टा हा पळसप येथील पारधी पिढी येथे आहे. त्यावर पथकाने आरोपीसह २५ हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा जप्त करुन त्याच्याविरुध्द शस्त्र कायदा कलम- ३, २५ सह मपोका >> पान २

# दिवाळी पाडव्यादिवशी तुळजाभवानी मंदिरात रांगोळी रेखाटन व दीपोत्सवाचे आयोजन

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथे संस्कार भारतीच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिवाळी पाडव्याच्या दिवशी दुपारी चार वाजेपासून सहा वाजेपर्यंत मंदिर परिसरामध्ये विविध रंगीत रांगोळ्यांचे रेखाटन करण्यात येणार आहे. यासाठी शहरातील रांगोळी कलावंतांनी दुपारी चार वाजता मंदिरात उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष प्रफुल्लकुमार शेटे व सौ सोनाली संतोष डोईफोडे यांनी केले आहे. १९९८ पासून संस्कार भारती तर्फे तुळजाभवानी मंदिरामध्ये दीपोत्सव आणि रांगोळी रेखाटन केले जाते. यावर्षी सुमारे ३०० किलो रंग आणि ३०० किलो रांगोळीचा उपयोग करून मंदिरामध्ये रांगोळीचे रेखाटन करण्यात येणार आहे. याप्रसंगी रांगोळी रेखाटन झाल्यानंतर सायंकाळी सहा वाजता मंदिर परिसरात दिवे लावून दीपोत्सव साजरा होईल. याप्रसंगी संस्कार भारतीचे कार्यकर्ते आणि मंदिर संस्थानचे कर्मचारी यांची उपस्थिती असणार आहे. तुळजापूर शहरातील इच्छुक रांगोळी कलाकारांनी दुपारी चार वाजता राजेश शहाजी महाद्वार येथे रांगोळी रेखाटन करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८ ९०० २४ ९१० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# आनंद उत्साह आणि मांगल्याला उधाण; घराघरांत दिवाळीच्या तेजाचे आगमन

## बाजारपेठेत चैतन्य; खरेदीला उत्साह

**आरंभ मराठी । धाराशिव**

हिंदू संस्कृतीमध्ये सण, परंपरा आणि अनेक समृद्ध रितीरिवाज आहेत. त्यातील सर्वांत मोठा सण म्हणजे दिवाळी. आनंदाचा.. उत्साहाचा आणि मांगल्याचा सण म्हणजे दीपावली. दिव्यांच्या झगमगासाठी हा सण ओळखला जातो. दिव्यांच्या प्रकाशातून ज्याप्रमाणे सारा परिसर उजळून निघतो त्याप्रमाणे आपल्या आयुष्यातील देखील षडरिपू, दुःख व अज्ञानरुपी अंधार ज्ञानाच्या व सुखाच्या प्रकाशाने नाहीसा व्हावा यासाठी दिवाळी साजरी केली जाते. आजपासून दिवाळीच्या मुख्य सणाला सुरुवात होत असून, चैतन्य आणि आनंदाने भारलेले वातावरण सर्वत्र निर्माण झाले आहे. सोमवारी वसुबारस पासून सुरू झालेला हा सण रविवारी भाऊबीजे पर्यंत साजरा होणार आहे. आज नरक चतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून अभ्यंगस्नान करून घरोघरी फराळाचा आस्वाद घेतला जाईल. उद्या (दि.१) घरोघरी आणि उद्योग व्यवसायाच्या ठिकाणी लक्ष्मीपूजन करण्यात येईल. तर शनिवारी पाडवा आणि रविवारी भाऊबीज साजरी करण्यात येणार आहे. तेजोमय आणि प्रकाशमय असणारा दिवाळी सण साजरा करताना बाजारात खरेदीला देखील उत्साह आल्याचे दिसून येत आहे.

**दिवाळीच्या खरेदीसाठी उत्साह, बाजारात चैतन्य**

दिवाळीतील खरेदीसाठी धाराशिव शहरातील बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. आज नरक चतुर्दशी असल्यामुळे दिवाळीच्या मुख्य सणाला सुरुवात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला बुधवारी शहरातील



बाजारपेठेत उत्साह दिसून आला. बाजारपेठ ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेली आहे. सोमवारी वसुबारसपासून दिवाळीला सुरुवात झाली आहे. परंतु दिवाळीचा मुख्य सण आजपासून सुरू होत आहे. बाजारात कपडे, आकाशकंदील, विद्युतमाळा, पूजेचे साहित्य, फटाके, तयार फराळाचे पदार्थ, किराणा साहित्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांची खरेदी केली जात आहे. त्याशिवाय सोन्याचे दागिने, वाहन खरेदीलाही लोकांची पसंती दिसून येत आहे. काळा मारुती चौक, नेहरू चौक येथील कापड बाजारामध्ये विविध कपड्यांच्या खरेदीसाठी उत्साह पाहण्यास मिळाला. घरातील थोरामोठ्यांसाठी आवर्जून कपड्यांची खरेदी केली. शहरातील बाजारपेठांमध्ये फ्रीज, वॉशिंग मशीन, फॅन, टीव्ही, मोबाईल अशा विविध इलेक्ट्रॉनिक साहित्याच्या खरेदीलादेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. दिवाळीच्या मुहूर्तावर दुचाकी किंवा चारचाकी वाहन घरी आणण्याच्या हेतूने विविध शोरूम व दुकानांमध्ये भेट देऊन त्यासाठी ॲडव्हॉन्स बुकिंग केले जात आहे. त्याशिवाय तयार फराळाचे पदार्थ, आकाशकंदील, विद्युतमाळा, फटाके यांचीही खरेदी जोरात सुरु असल्याचे चित्र दिसत आहे. सणानिमित्त बाजारपेठेत वेगवेगळ्या ऑफर देण्यास सुरुवात केली असून त्याचाही लाभ ग्राहक घेत आहेत.

# तुळजापूर विधानसभेसाठी दाखल झालेल्या ८७ अर्जपैकी १० अर्ज छाननीत बाद

## तीन उमेदवारांचे नामनिर्देशन फेटाळले

**आरंभ मराठी । तुळजापूर**

२४१ तुळजापूर विधानसभा मतदारसंघासाठी २९ ऑक्टोबर या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण ५४ उमेदवारांचे ८७ नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. त्याची छाननी बुधवारी पार पडली. यावेळी छाननी मध्ये ८७ पैकी १० अर्ज अवैध होऊन ७७ अर्ज वैद्य ठरवण्यात आले. तसेच ५४ पैकी ३ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र फेटाळण्यात आले व ५१ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहेत. वैध झालेल्या अर्जामध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे ४ उमेदवार असून त्यामध्ये राणाजगजीतसिंह पाटील, कुलदीप उर्फ धीरज पाटील, मलंग गुडूलाल शेख व जीवनराव गोरे यांचा समावेश आहे. तर इतर उमेदवारांमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाकडून अण्णासाहेब दराडे, समाजवादी पार्टीकडून देवानंद रोचकरी, वंचित बहुजन आघाडी कडून डॉ. स्नेहा सोनकाटे, राष्ट्रीय समाज पक्षाकडून धनंजय पाटील यांचा समावेश असून इतर अपक्ष उमेदवार आहेत. त्यामध्ये मधुकरराव चव्हाण, अशोक जगदाळे, महंत तुकोजी बुवा, सज्जन साळुंके, सत्यवान सुरवसे, अमीर शेख यांच्यासह एकूण ५१ उमेदवारांचा समावेश आहे. अर्ज माघारी घेण्याची तारीख ही ४ नोव्हेंबर असून, त्यानंतर तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे चित्र स्पष्ट होणार आहे.



संपादकीय....

## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

# मतदानाचा कमी होत जाणारा टक्का : एक गंभीर समस्या



लोकशाहीत नागरिकांनी मतदानाद्वारे आपल्या प्रतिनिधींची निवड करून शासनात सक्रिय सहभाग घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये गेल्या काही वर्षांपासून मतदानाचा टक्का कमी होत असल्याचे दिसून येत आहे. ही घट चिंताजनक आहे, कारण मतदान ही लोकशाहीची कणा आहे. जर लोक मतदान प्रक्रियेत सहभाग घेत नसतील, तर लोकशाहीचा पाया कमकुवत होतो.

**महाराष्ट्रातील आकडेवारी:** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये मतदानाच्या टक्केवारीत सातत्याने घट होत आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत फक्त ६१.२३% मतदान झाले, तर २०१४ मध्ये हा आकडा ६३.३८% होता. म्हणजेच, पाच वर्षांच्या अंतरात मतदानात घट झाली. शहरी भागांमध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे. उदाहरणार्थ, मुंबईतील २०१९ च्या निवडणुकीत केवळ ४६.१३% मतदान झाले, जे राज्यातील सर्वात कमी मतदान असलेले शहर होते. पुणे, नागपूर आणि ठाणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्येही मतदानाचे प्रमाण कमी राहिले आहे.

**मतदान कमी होण्याची कारणे**

**-शहरी उदासीनता:** मोठ्या शहरांमध्ये मतदानाचा टक्का कमी असल्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकांचा राजकीय प्रक्रिया प्रति उदासीन दृष्टिकोन. या दिवशी मिळणाऱ्या सुट्टीला राष्ट्रीय जबाबदारी म्हणून न पाहता याचा उपयोग सहलीसाठी केला जातो ..म्हणूनच या दिवशी पर्यटन स्थळे गजबजलेली दिसतात .बऱ्याच जणांना राजकीय प्रक्रियेची आवड नसते किंवा ते आपल्या एका मताचा काही परिणाम होईल असे मानत नाहीत.

-राजकीय निराशा: काही मतदारांना असे वाटते की निवडून आलेले नेते जनतेच्या अपेक्षांना पुरेसे उत्तर देत नाहीत. त्यामुळे लोकांना मतदानाची प्रेरणा राहत नाही.

**-तरुणांचा कमी सहभाग:** तरुण मतदारांमध्ये मतदानाबद्दल जास्त जागरूकता नसते. त्यांना मतदानाचे महत्त्व समजून घेण्यास वेळ लागतो किंवा त्यांना वाटते की त्यांचे मत निरर्थक आहे.

-प्रवास आणि वेळेची समस्या: ग्रामीण भागातून किंवा कामानिमित्त शहरी भागात स्थलांतरित झालेल्या नागरिकांना त्यांच्या मूळ गावात जाऊन मतदान करणे कष्टाचे वाटते. मतदानासाठी लागणारा वेळ आणि प्रवास यामुळे अनेक जण मतदान करायला जात नाहीत. शिवाय मजुरी बुडण्याची चिंता वाटते.

**मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाय**

**-मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करणे:** शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन मतदानाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांमध्ये मतदानाचे महत्त्व वाढवणे गरजेचे आहे.

**-सोयीस्कर मतदान केंद्रे:** शहरी भागातील काम करणाऱ्या वर्गाला मतदानासाठी वेळ काढणे कठीण जाते. यासाठी सरकारने अधिक सोयीस्कर आणि जवळच्या मतदान केंद्रांची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

-ऑनलाईन मतदानाची व्यवस्था: आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन मतदानाची सोय केली जाऊ शकते. यामुळे मतदारांना कुठूनही मतदान करता येईल आणि मतदानाचा टक्का वाढेल.

**-प्रेरणादायी प्रचार मोहीमा:** कलाकार, खेळाडू आणि इतर प्रसिद्ध व्यक्तींनी मतदानाच्या महत्त्वाबद्दल जनतेमध्ये जागरूकता निर्माण करावी. प्रसारमाध्यमांचा प्रभावी वापर करून मतदानासाठी प्रेरणा दिली जाऊ शकते.

**-नेत्यांचा प्रामाणिकपणा:** राजकीय नेत्यांनी जनतेशी प्रामाणिक राहणे गरजेचे आहे. जेव्हा जनता आपल्या नेत्यांवर विश्वास ठेवते, तेव्हा ते अधिक उत्साहाने मतदान प्रक्रियेत सहभागी होतात.




प्रविण जरीचंद माळवदे
मो नं -८६०५५३११९९


महाराष्ट्रातील कमी होत जाणारा मतदानाचा टक्का हा एक गंभीर विषय आहे. लोकशाहीच्या भक्कम अस्तित्वासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर एक कर्तव्य आहे, ज्याद्वारे नागरिक आपल्या देशाच्या भवितव्यासाठी निर्णय घेतात. सरकारने आणि सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन मतदारांना जागरूक करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मतदानाचे महत्त्व समजले तरच महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये अधिक सहभाग वाढेल, आणि लोकशाही अधिक मजबूत होईल. मतदान करून आपण आपल्या हक्काचा वापर करतो आणि देशाच्या विकासात हातभार लावतो. म्हणूनच, प्रत्येकाने आपले मत नोंदवून लोकशाही प्रक्रियेत भाग घ्यावा.




# कैलास पाटील यांच्या विजयासाठी पत्नी शुभांगी पाटील यांच्यासह खासदार ओमराजे यांच्या पत्नी संयोजनी राजेंची प्रचारात आघाडी

## डोअर टू डोअर साधला जातोय संवाद; महिला-भगिनींकडून प्रतिसाद

आरंभ मराठी । धाराशिव

एकीकडे महायुतीच्या उमेदवारांमध्ये बंडाळी निर्माण झाली असताना महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास पाटील यांच्यासाठी प्रचार यंत्रणा कामाला लागली आहे. पदाधिकारी, कार्यकर्ते कैलास पाटील यांच्यासाठी जीवाचे रान करत आहेत.सरकारने लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली केलेली फसवणूक महिलांना लक्षात आणून देण्यासाठी आणि आमदार कैलास पाटील यांनी केलेल्या कामांची माहिती देण्यासाठी आमदार कैलास पाटील यांच्या पत्नी शुभांगी पाटील तसेच खासदार ओमराजे यांच्या पत्नी संयोजनी राजे निंबाळकर यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे.

दोघींनीही मंगळवारी कळंब तालुक्यातील आठ ते दहा गावात डोअर टू डोअर प्रचार करत महिला तसेच नागरिकांशी संवाद साधला. गेल्या काही दिवसापासून त्यांनी प्रचार सुरु केला असून, महिलामध्येही त्यांचे स्वागत होत आहे.सध्या मतदारसंघात दोघींनीही आघाडी घेतली आहे. लोकसभेलाही दोघीनी प्रचारात मोठी भूमिका बजावली होती. घरोघरी गेल्याने त्यांच्याशी महिला देखील आपुलकीने संवाद साधत आहेत. सध्या लाडकी बहिण



योजनेमुळे सत्ताधारी मंडळी महिलांच्या मताची बेरीज करताना दिसतात. मात्र, पाटील आणि राजेनिंबाळकर या दोघीही शासन महिलांची कशी फसवणूक करत आहे, हे उदाहरणासह सांगत आहेत. त्यावरही महिलामधून प्रतिसाद मिळत आहे. महागाई किती वाढली व योजनेनंतर त्यामध्ये अजून कशी वाढ झाली, याबद्दलही माहिती दिली जात आहे.

# राज ठाकरेंना निवडणूक आयोगाकडून मोठा धक्का!

आरंभ मराठी । मुंबई

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये २५० च्या आसपास जागा लढवण्याची घोषणा करणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरें यांनी ना युती ना आघाडी असं धोरण जाहीर केलं होतं. राज ठाकरेंनी त्यानंतर सात वेगवेगळ्या याद्यांमधून मनसेचे उमेदवार जाहीर केले. मनसेनं यंदाच्या निवडणुकीमध्ये एकूण १३८ उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याआधीच मनसेला मोठा धक्का बसला आहे. राज ठाकरेंच्या एका सहकाऱ्याला निवडणुकीमध्ये जनतेच्या दारात जाऊन कौल मागण्याआधीच अपात्र ठरवण्यात आले आहे. त्यामुळे यंदा मनसेकडून १३७ उमेदवारच आपले नशीब मतपेटीतून आजमावणार आहेत हे स्पष्ट झाले आहे.

नेमके घडले काय?

अकोला जिल्ह्यातील अकोला पश्चिम मतदारसंघातून राज ठाकरेंच्या पक्षाने प्रशंसा आंबेरे यांना संधी दिली. प्रशांत आंबेरे यांनी आपल्या उमेदवारीचा रितसर अर्ज दाखल केला. मात्र तपासणीदरम्यान प्रशांत यांचा अर्ज रद्द करम्यात आला आहे. मनसेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

का रद्द केला अर्ज?

मनसेचे उमेदवार प्रशांत अंबेरेंचा अर्ज का रद्द करण्यात आला याबद्दल मनसैनिकांमध्ये संभ्रम असला तरी ते निवडणूक आयोगाच्या निकषांना पूर्ण करणारी एका म हत्त्वाच्या अटीत बसत नसल्याचं अर्जाच्या छाणणीदरम्यान निष्पन्न झालं आहे. नियमानुसार विधानसभेच्या निवडणुकीकरिता निवडणूक आयोगाने २५ वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तीला उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची अट घातली आहे. मात्र अकोला पश्चिमचे मनसे उमेदवार प्रशंसा अंबेरे यांचं वय २५ वर्षापेक्षा कमी असल्याने यांचा नामांकन अर्ज छाणनीदरम्यान बाद करण्यात आला आहे. मनसेकडून उमेदवारी मिळालेल्या प्रशांत अंबेरेंना वयाची २५ पूर्ण करण्यासाठी अवघे २४ दिवस कमी पडले आहेत. मात्र वयाची अट ही मूलभूत अट असल्याने प्रशांत अंबेरेंना थेट अपात्र ठरवण्यात आलं आहे.

पान १ वरून...

## गावठी पिस्तुल व तलवारीसह दोन आरोपी ताब्यात

१३५ अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. तसेच एका प्रकरणात आरोपी राज पांडुरंग पवार (वय १९ वर्षे, रा.तुळजापूर) हा बेकायदेशीररीत्या अंदाजे एक हजार रुपये किंमतीची तलवार जवळ बाळगलेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास आर्या चौक तुळजापूर येथे दिसून आला. यावरुन पथकाने तलवार जप्त करुन त्या व्यक्तीविरुध्द शस्त्र कायदा कलम- ४, २५ अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक संजय जाधव, मा. अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस हावलदार विनोद जानराव, अमोल निंबाळकर, समाधान वाघमारे, महिला पोलीस हावलदार शोभा बांगर, पोलीस नाईक -नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस अंमलदार- प्रकाश बोईनवाड,गुरव, दहिहांडे, यांच्या पथकाने केली.

## घामाचा झरा

हाती घेवून टिकाव,
बा खंदितो घाई घाई.
डोईवर वाहती माती,
भरोनिया पाटी माई.

त्याच्या कृष देहातून,
वाही घामाचा झरा.
देह चमकत असे,
उघडाबंब सारा.

माय कासावीस होई,
वाढता उन्हाचा उकाडा.
घेई चालता चालता,
ती पदराणे वारा.

तालीवर बा बसून,
तंबाखूला लावी चुन्हा.
माप घेई पातूर,
जपी बराशीच्य खुणा.

पगार सरकारी कामाचे ,
नाय यळला कधी झाले.
शिळ्या पाक्या भाकरीवरं
सण वार साजरे केले.




गोकुळ गायकवाड
जामखेड: ९४२३१८३८२२


# चार मतदार संघात १६४ उमेदवारांचे २२३ नामनिर्देशनपत्र वैध तर ४८ अवैध

## ■ १८५ उमेदवारांनी दाखल केले होते २७१ नामनिर्देशनपत्र
## ■ ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार

आरंभ मराठी । धाराशिव

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी प्रक्रिया बुधवारी पार पडली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा २९ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवसापर्यंत जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात १८५ उमेदवारांनी २७१ नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. यापैकी चार विधानसभा मतदारसंघातून १६४ उमेदवारांचे २२३ नामनिर्देशनपत्र वैध तर ४८ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहेत. बुधवारी नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली. २४० - उमरगा विधानसभा मतदारसंघातून एकूण प्राप्त ३२ उमेदवारांच्या ४३ नामनिर्देशनपत्रापैकी ३४ नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहे. तर ९ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे. प्राप्त नामनिर्देशनपत्रामध्ये २८ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे. ४ नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहे.

शेवटच्या दिवशी २९ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघातून १८५ उमेदवारांनी २७१ नामनिर्देशनपत्र दाखल केले. यामध्ये उमरगा विधानसभा मतदारसंघातून ३२ उमेदवारांनी ४३, तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून ५४ उमेदवारांनी ८७, उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातून ५० उमेदवारांनी ७१ आणि परंडा विधानसभा मतदारसंघातून ४९ उमेदवारांनी ७० नामनिर्देशनपत्र दाखल केले.

२४१ - तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ५४ उमेदवारांनी ८७ नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. यापैकी ७७ नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. तर १० नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहे.वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची संख्या ५१ इतकी आहे तर ३ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत.

२४२ - उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात ५० उमेदवारांनी ७१ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५५ नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहेत.तर १६ उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत.वैधरित्या नामनिर्देशित झालेले ४३ उमेदवार असून ७ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत.

२४३ - परंडा विधानसभा मतदार संघात ४९ उमेदवरांनी ७० नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले होते.त्यापैकी ५७ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत.तर १३ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहेत. यातील ४२ उमेदवार हे वैधरित्या नामनिर्देशित झाले आहेत तर ७ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत.



छाननी प्रक्रियेनंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत.२० ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील १ हजार ५२३ मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदान होणार आहे.

## विविध वृत्त...



### शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके यांच्या वाढदिवसानिमित्त संदीप खरसडे यांच्या तर्फे जिजामाता शाळेला २५ बेंच भेट

**आरंभ मराठी । परंडा**

धाराशिव शिवसेनेचे जिल्हाप्रमुख माजी जिल्हा परिषद सदस्य तथा जिजामाता शाळेचे संस्थापक अध्यक्ष दत्ता साळूंके यांचा वाढदिवस बुधवारी परंडा येथील जिजामाता शाळेत मान्यवरांच्या उपस्थीतीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साळुंके यांचा सत्कार करण्यात आला. साळुंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ड . संदिप खरसडे यांच्या वतीने जिजामाता शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी २५ बेंच भेट देण्यात आले. या बेंचची भेट जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी सुभाष मोरे, गजेंद्र सुर्यवंशी, विशाल देवकर, जयदेव गोफणे, अ‍ॅड .सोमनाथ भोरे,दत्ता रणभोर, भानुदास खैरे, नागनाथ नरूटे पाटील, नागेश मांजरे, बालाजी नेटके, आशोक गरड, नागनाथ पाटील, सतिश मेहेर,जिजामाता शाळेचे मुख्याध्यापक सत्यजीत घाडगे,अमर साळूंके, अंकित साळूके,समर्थ साळूंके, शिक्षक एस बी.पाटील,एस पी गवळी,शिंदे एन आर, पाबळे,एन एन, विजय खरसडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### आमदार राणा पाटील यांचे वाढदिवसानिमित्त तेर येथे अभिष्टचिंतन



**आरंभ मराठी । तेर**

तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तेर येथे त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. आ.राणादादांनी यावेळी संत गोरोबाकाका यांच्या समाधी मंदीरासह ,पद्मावती देवी, कोष्ट अंबिका देवीचे दर्शन घेतले. जुन्या बसस्टँडवर आ.पाटील यांचा जि.प.चे.माजी सदस्य नवनाथ इंगळे, माजी उपसरपंच भारत नाईकवाडी, ग्रा.प.सदस्य नवनाथ पसारे, सुमेध वाघमारे, इर्शाद मुलानी प्रवीण साळूंके, बबलू आबदरे यांनी आ.पाटील यांचा पुष्पहार, शाल फेटा,श्रीफळ देऊन अभिष्टचिंतन केले.

### गणेश रोचकरी यांना राष्ट्राचे शिल्पकार पुरस्कार प्रदान




**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथील रोटरी क्लब ऑफ तुळजापूरच्या वतीने २०२४-२५ साठी देण्यात येणारा राष्ट्राचे शिल्पकार पुरस्कार नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ चे मुख्याध्यापक गणेश रोचकरी यांना रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.प्रशांत अपराध सचिव रो. संतोष लोखंडे, तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे मुख्याध्यापक वैजनाथ घोडके, पोद्दार स्कूलचे मुख्याध्यापिका श्रुतिका रम्या यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. रोचकरी यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या कालावधीत शाळेला विविध भौतिक, मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्न केला. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध माध्यमातून प्रयत्न केला. तसेच शासनाचे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले. विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. याच कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब यांनी त्यांना राष्ट्राचे शिल्पकार हा पुरस्कार प्रदान केला. त्यांच्या या यशाबद्दल मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, गटशिक्षणाधिकारी मेहरुबा इनामदार , विस्तार अधिकारी मल्लिनाथ काळे,युवास्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कावरे, प्रकाश मगर, केंद्रप्रमुख मोहन भोसले यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांच्याकडून निवडणूक कामकाजाचा आढावा

**आरंभ मराठी । मुंबई**

वर्सोवा विधानसभा मतदारसंघ क्रमांक १६४ मधील निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांनी घेतला. या मतदारसंघात मागील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत अधिक मतदान होण्यासाठी मतदार जागृती कार्यक्रमावर भर देण्याचे आवाहन श्री बाली यांनी केले.
भारत निवडणूक आयोगाच्या सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करत आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही श्री बाली यांनी यावेळी दिले. निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष काकडे यांनी सादरीकरण केले.

# कांदा पिकावर करपा आणि मर रोगाचा प्रादुर्भाव; शेकडो हेक्टर कांद्याचे पीक धोक्यात

## हजारोंची फवारणी करूनही रोग आटोक्यात येईना ; कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत

**रमेश नरवडे । आरंभ मराठी**

**पळसप** : यंदा पाऊसकाळ जास्त झाल्याने आणि जमिनीतील ओलावा कमी होत नसल्याने जमिनीतील बुरशीचे प्रमाण वाढून कांद्यावर बुरशीजन्य रोग मर आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामुळे कांद्याची पाती पिवळी पडुन त्याला पीळ पडत आहे. त्यामुळे कांदा पिकाची वाढ खुंटून पीक धोक्यात आले आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेकडो हेक्टर कांदा पीक धोक्यात असून, शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे.

कांदा पिकाला जे पोषक वातावरण पाहिजे ते वातावरण मिळत नसल्याने आणि जमिनीतील सततची टिकून राहिलेली ओल यामुळे कांदा पिकाची वाढ होत नसल्याने शेतकरी कीटकनाशके आणि बुरशीनाशकांची फवारणी मोठ्या प्रमाणात करत आहेत. यंदा सर्वच भागात पाऊस जास्त झाल्याने पावसाळी कांदा उत्पन्न घटले आहे. त्यामुळे कांद्याला उचांकी दर मिळतील अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. मात्र रोगाच्या प्रादुर्भावामुळे फवारणीसाठी जास्तीचा खर्च करूनही पीक हातात सापडेल का नाही याबद्दल साशंकता असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात

### कुठल्याच औषधाचा फरक पडेना

कांदा पीक सध्या दोन ते अडीच महिन्याचे आहे. पुढचे दीड ते दोन महिने या पिकासाठी अत्यंत महत्वाचे असतात. या काळात थंडीमुळे कांदा फुगत असल्यामुळे या काळात कांद्याचे खत व्यवस्थापन आणि पाणी व्यवस्थापन करण्यात शेतकरी मग्न असतात. परंतु पाऊस बंद झाल्यानंतर गेल्या पंधरा दिवसांपासून कांद्यावर रोग पडल्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी सेवा केंद्रातून आणलेल्या वेगवेगळ्या औषधांची फवारणी कांद्यावर केली. मात्र, तरीही हा रोग आटोक्यात येत नसल्याने शेतकरी चिंतेत असल्याचे दिसते. कृषी सेवा केंद्र चालक देखील या रोगावर नेमके कोणते औषध उपाय करेल हे ठामपणे सांगू शकत नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न पडला आहे.

### रोगामुळे कांद्याचे उत्पन्न घटणार

सततच्या पावसामुळे सकाळी पडणारे धुके आणि जमिनीतील बुरशी यामुळे कांदा पिकावर करपा आणि मर रोगाचा परदुर्भाव झाल्यामुळे फवारणीच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आतापर्यंत एकरी ५० ते ६० हजार रुपये खर्च आला आहे. रोगाच्या प्रादुर्भावामुळे उत्पन्न घटून आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे.

**-ज्ञानेश्वर सरडे**
**कांदा उत्पादक शेतकरी, पळसप**




### योग्य वेळेत फवारणी करून पिकाचे संरक्षण करावे

कांदा पिकावर मर आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकऱ्यांनी सकाळच्या वेळेमध्ये कोणत्याही कंपनीचे बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची वेळेत फवारणी करून पिकाचे संरक्षण करावे.

**-सचिन मगर, कृषी सहाय्यक, पळसप**

### पुण्यात दिव्यांग मतदारांनी घेतली मतदानाची शपथ

**आरंभ मराठी । पुणे**

विधानसभा कार्यालयामार्फत दिव्यांग मतदारांसाठी येत्या विधानसभा निवडणूकीसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने दिव्यांगांना मतदान करणे सोपे होणार आहे, असे मत दिव्यांग मतदारांनी व्यक्त केले. निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघामध्ये व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने निगडी येथील व्यापारी संकुलाच्या जवळ झालेल्या दिव्यांग बांधवांच्या बैठकीदरम्यान मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी दिव्यांग व्यक्तींनी आपली मते मांडली, या मतदान जनजागृती कार्यक्रमास स्वीप नोडल अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग कक्षाचे नोडल अधिकारी शरद पाटील, सहाय्यक नोडल अधिकारी उमा दरवेश, बालाजी गिते, विशाल गायकवाड, प्रतिक लोखंडे, तसेच स्वीप विभागाचे राजेंद्र कानगुडे, दिनेश जगताप, संदीप सोनवणे, महालिंग मुळे, प्रहार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय भोसले, महिला अध्यक्ष संगीता जोशी,भारतातील पहिले सनदी लेखापाल भूषण तोष्णीवाल, राजेंद्र वाघचौरे, रमेश पिसे आणि दिव्यांग मतदार उपस्थित होते.



तेजोमय आणि प्रकाशमय असणारा दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा होत असून, फटाक्यांची आतिषबाजी करून सण साजरा करण्यासाठी धाराशिव शहरातील लेडीज क्लब येथील फटाका मार्केटमध्ये फटाके खरेदीसाठी लहानमोठ्यांची मोठी गर्दी होत आहे. यावर्षी फटाक्यांच्या किंमतीत २५ ते ३० टक्के वाढ झाली असली तरी फटाके खरेदीसाठी ग्राहकांमध्ये उत्साह दिसून येत आहे. दरवर्षी लेडीज क्लब येथील फटाका मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते.

### व्यापक जनजागृती कार्यक्रम, धाराशिवमध्ये सायकल रॅली

**आरंभ मराठी । धाराशिव**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान येत्या २० नोव्हेंबर रोजी व्हावे, यासाठी जिल्ह्यात व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
बुधवारी मतदान जनजागृती कार्यक्रमाचा एक भाग म्हणून धारशिव येथे सायकल रॅली आयोजित करण्यात आली. सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून सायकल रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.या रॅलीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष,अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके,जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे,गट शिक्षणाधिकारी असरार सय्यद,विस्तार अधिकारी श्री. देवगुडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.शिक्षक पाटील यांचा बोलका बाहुला सुद्धा रॅलीत सहभागी होता. बोलक्या बहुल्याने सुद्धा मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन यावेळी केले.



ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालय,सेंट्रल बिल्डिंग चौक,बार्शी नाका,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,अण्णाभाऊ साठे चौक या मार्गाने परत जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचली.या रॅलीमध्ये छत्रपती शिवाजी हायस्कूल,पोतदार इंटरनॅशनल स्कूल यासह अन्य शाळांचे विद्यार्थी,शिक्षक व विविध विभागाचे कर्मचारी सहभागी होते. विद्यार्थ्यांनी रॅलीतून मतदान जागृती करणाऱ्या घोषणा दिल्या तसेच जनजागृती करणारे पोस्टर्स सायकलवर दर्शनी भागात लावण्यात आले होते.

### पिंपरी चिंचवडमध्ये खोदकाम करताना आढळले 3 ब्रिटीशकलीन बॉम्ब; पोलीस, अग्निशमन दल, बॉम्ब नाशक पथक घटनास्थळी दाखल


**आरंभ मराठी । पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवडमध्ये तीन ब्रिटिशकालीन बॉम्ब आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या प्रेम लोक पार्क परिसरात आढळून आले आहेत. खोदकाम सुरू असतानाच हे बॉम्ब आढळले आहेत. घटनास्थळी पोलिस, अग्नीशामक दल, बॉम्ब नाशक पथक आढळून आलं आहे. महानगर पालिकेकडून पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपच लिकेज काढण्यासाठी खोदकाम सुरू असताना कामगारांना तीन ब्रिटिशकालीन बॉम्ब आढळलेत. घटनास्थळी पोलीस, अग्निशमन दल, बॉम्ब शोधक आणि नाशक पथक दाखल झालं असून काम तपास सुरू आहे. पिंपरी चिंचवडमध्ये प्रेम लोक पार्क परिसरात सकाळच्या सुमारास बॉम्ब आढळून आले आहेत. पाणीपुरवठा पाईपच लिकेज काढताना खोजकाम केल्यानंतर या ठिकाणी बॉम्ब आढळले, याबाबतची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल, बॉम्ब शोधक आणि नाशक पथक दाखल झालं असून काम तपास सुरू आहे. हे जुन्या प्रकारचे बॉम्ब आहेत, अशी माहिती यावेळी तपास पथकाने दिली आहे.

# राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ बनतोय मृत्यूचा सापळा

## नळदुर्ग ते जळकोट दरम्यान वाहतूक कोंडीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले

## चौपदरीकरणाचे काम सात वर्षांपासून अर्धवट





**आरंभ मराठी । नळदुर्ग**

नळदुर्ग शहराजवळून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ मुंबई- हैदराबाद रस्त्यावरील नळदुर्ग ते जळकोट दरम्यानच्या आठ किमी महामार्गांवर मोठमोठे खड्डे पडल्याने मोठी वाहने चालविणाऱ्या वाहन चालकासह दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता मृत्यूला आमंत्रण देणारा सापळा ठरत आहे. आठवडा भरापूर्वी उमरगा पोलीस ठाण्याच्या एका पोलिस कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यू झाला होता. तर एका कर्मचाऱ्याचे दोन्ही पाय निकामी झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती.
महामार्गवरील बसस्थानक समोर, जुना जकात नाका जवळ, आपलं घर जवळ सध्या पावसामुळे खड्डेच -खड्डे पडलेले आहेत. या महामार्गवरून दररोज होणाऱ्या अपघातामुळे अनेक जणांना आपले जीव नाहक गमवावे लागत आहेत. याचा राष्ट्रीय महामार्ग व राष्ट्रीय रस्ता प्राधिकरण विभागाने गांभीर्याने विचार करून रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्याची तात्काळ डागडुजी करावी तसेच राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या कामात गती आणावी अशी मागणी नळदुर्ग शहर व परिसरातील वाहनचालकांच्या वतीने करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर राष्ट्रीय रस्ता प्राधिकरणाच्या देखरेखीखाली मुंबई- हैदराबाद रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे.
मात्र रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाचा ठेका घेतलेले काही ठेकेदार व पोट ठेकेदार अर्धवट काम करून निघून गेल्यामुळे गेल्या सहा-सात वर्षांपासून रस्त्याचे काम अपूर्ण आहे व सध्या संथगतीने सुरू आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ मुंबई- हैदराबाद रस्ता असल्याने दररोज हजारो वाहनांची वर्दळ या रस्त्यावर असते. त्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता असा प्रश्न रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वाहनचालकांना पडत आहे. त्यामुळे या रस्त्यावर मोठे व दुचाकी वाहने चालविणे अवघड झाले आहे. कारण दुचाकी चालविताना रस्त्यावर पडलेले खड्डे चुकविण्याच्या नादात एकमेकांना धडकत असल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होऊन मृत्यू व गंभीर जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे रस्त्यावर अपघात नामक यमराजाने मृत्यूचा सापळा तर लावला नाही ना अशी शंका वाहनचालकांतून उपस्थित केली जात आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात पाणी साचल्याने रात्रीच्या वेळेस अंधाराचा अंदाज न आल्याने वाहने एकमेकांना धडकत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत.
यापूर्वी नळदुर्ग शहर व परिसरातील नागरिक तसेच विविध संघटनांच्या वतीने वेळोवेळी आंदोलन करून सुद्धा राष्ट्रीय महामार्ग, राष्ट्रीय रस्ता प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी या गंभीर प्रश्नाला गांभीर्याने न घेता जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. महत्त्वाची बाब म्हणजे एकीकडे केंद्र शासन खड्डेमुक्त रस्ते करण्याकरिता हजारो कोटी रुपये खर्च करीत आहे. मात्र त्याचे विपरीत संबंधित खात्याचे अधिकारी वागत असल्याने अनेक जणांना आपले बहुमूल्य जीव गमवावे लागत आहेत. त्यामुळे आणखी किती जणांचे जीव गेल्यानंतर संबंधित खात्याचे अधिकारी जागे होणार असा संतप्त प्रश्न वाहनचालक व सर्वसामान्य माणसातून उपस्थित केला जात आहे. संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी नळदुर्ग- जळकोट दरम्यान रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याची तात्काळ डागडुजी करून चौपदरीकरणाच्या कामाचा वेग वाढवून तात्काळ रस्ता सुरू करावा अशी मागणी केली जात आहे. पावसाळ्यात पडलेल्या खड्ड्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

> राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे. त्याचबरोबर रस्त्यावर पडलेले खड्डे चुकवताना वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे. त्याच बरोबर मणक्याचे व इतर आजार उद्भवतात. त्यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच आर्थिक नुकसान देखील होतो त्यामुळे संबंधित विभागाने रस्त्याची तात्काळ डागडुजी करावी.
>
> **-अल्फाज शेख**
> **वाहन चालक, पुणे**

THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०

# उमरगा विधानसभा मतदारसंघात काँटे की टक्कर

## ■ प्रमुख उमेदवार मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला ■ मतदारसंघात जातीय समीकरणे ठरणार महत्वाची

**मोहन जाधव । आरंभ मराठी**

**मुरुम :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून राज्यभरात राजकीय वातावरण तापले आहे. राज्यात अनेक ठिकाणी विचित्र घटना घडत आहेत. तर मतमोजणीच्या दिवशी २३ नोव्हेंबर रोजी अनेक मतदारसंघात अनपेक्षित निकाल लागु शकतो असे भाकीत राजकीय विश्लेषकांकडून वर्तविले जात आहे. याच पार्श्र्वभूमीवर उमरगा लोहारा विधानसभा मतदारसंघात महायुतीने विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले यांना संधी दिली असून महाविकास आघाडीने मात्र शेवटच्या टप्प्यात प्रवीण स्वामी यांना उमेदवारी घोषित केली आहे. मतदारसंघात शिवसेना उबाठा पक्षाशी गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठावंत असणारे गुंजोटी येथील विलास व्हटकर यांना डावलल्याने तालुक्यात सर्वच ठिकाणी निष्ठावंतांना न्याय मिळाला नसल्याच्या चर्चा सुरू आहेत. याशिवाय चर्चेत असणाऱ्या नावांव्यतिरिक्त अचानकच वेगळ्या नावाची घोषणा केल्याने राजकीय क्षेत्रात आश्र्चर्य व्यक्त केले जात आहे. तर सोशल मीडियावर प्रवीण स्वामी हे भाजप विचारांचे असून त्यांना महाविकास आघाडीने उमेदवारी कशी काय दिली ? अशा चर्चा होत आहेत. महाविकास आघाडीने शेवटच्या टप्प्यात प्रवीण स्वामी यांना उमेदवारी जरी जाहीर केली असली तरी महाविकास आघाडीचा पारंपारिक मतदार असणारा दलित समाज मात्र महाविकास आघाडीच्या या निर्णयाने दुखावला असल्याचे दिसत आहे. दलित समाजाचे म्हणणे होते की, नियमानुसार जरी स्वामी हे आरक्षित



जागी बसत असले तरी स्वामी हे लिंगायत समाजाचे गुरु म्हणून मानले जातात. त्यामुळे ते खुल्या गटातले असल्याचे बोलले जात आहे. उमरगा विधानसभा मतदारसंघ राखीव असून या मतदारसंघात ओबीसीचे अंदाजे मतदान ८२०००, मराठा एक लाखाच्या आसपास, लिंगायत व मुस्लिम समाजाची मते जवळपास ४१००० इतकी आहेत. तर दलित मतदार ४५००० आहेत. असे मिळून जवळपास ३ लाख १५ हजार मतदारांचे मतदान आहे. यामध्ये ओबीसीचे मतदान हे महायुतीला होण्याची शक्यता आहे तर तालुक्यात मराठा समाजाचे मतदान हे एक्स फॅक्टर ठरणार आहे. १ लाख मतदार असलेल्या मराठा समाजाचे जवळपास ८० टक्के मतदान मनोज जरांगे पाटील यांच्या घोषणेनुसार होऊ शकते. तसेच मुस्लिम समाज हा ७० टक्के महाविकास आघाडी सोबत जाऊ शकतो. तर स्वामी यांना उमेदवारी दिल्याने लिंगायत समाजाचे जवळपास ८० टक्के मतदान महाविकास आघाडीला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर दलितांचे मतदान हे ७० ते ८० टक्के समाजाच्या उमेदवाराला किंवा महायुतीकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मतदारसंघात मराठा समाजाचे मतदान हे निर्णायक ठरणार आहे. त्यांचे मतदान ज्या बाजूला होईल तो उमेदवार या विजयाची पताका फडकावू शकतो अशी राजकीय विश्र्लेषकांची मते आहेत. विधानसभा मतदारसंघातील सर्वच परिस्थिती पहिली तर एकंदरीत ही लढत हायव्होल्टेज होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. याशिवाय प्रचाराला सुरुवात झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मतदार संघात सर्वच प्रकारचे चित्र स्पष्ट होईल.

### जरांगे फॅक्टर ठरणार महत्त्वाचा

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची उमरगा विधानसभा मतदारसंघातील प्रहार पक्षाचे उमेदवार सातलिंग स्वामी, अपक्ष उमेदवार कैलास शिंदे, महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले यांनी आतापर्यंत भेटी घेतल्या आहेत. तर महाविकास आघाडीचे प्रवीण स्वामी यांनी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी भेटले असून येणाऱ्या काळात देखील भेटणार असल्याचे महाविकास आघाडी कडून सांगण्यात आले. सर्वच उमेदवार यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली असली तरी येणाऱ्या काळात मनोज जरांगे पाटील हे कुणाच्या बाजूने आवाहन करतील हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

### छाननीअखेर २८ उमेदवारांचे ३४ अर्ज वैध

सात दिवसात ७१ जणांनी १२२ अर्ज खरेदी केले होते त्यापैकी ३२ उमेदवारांनी ४३ अर्ज दाखल केले. यामध्ये छाननी झाल्यानंतर ४३ पैकी ३४ अर्ज वैध ठरवले गेले. ९ अर्ज अवैध ठरवण्यात आले आहेत. ३२ उमेदवारांपैकी २८ उमेदवार पात्र ठरले असून ४ उमेदवार अपात्र झाले आहेत. नामनिर्देशन पत्र माघार घेण्याची अंतिम दिनांक ४ नोव्हेंबर असून मंजूर नामनिर्देशनापैकी किती उमेदवार आपले अर्ज माघारी घेतात, हे चार तारखेलाच कळणार आहे.

## ठळक

### सागर चव्हाण यांचे निधन

**आरंभ मराठी । धाराशिव**



भीम नगर येथील तरुण सामाजिक कार्यकर्ते सागर शहाजी चव्हाण (वय ४२) यांचे बुधवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी शहरातील बौद्ध स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, २ मुली आहेत. अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी असलेल्या आणि प्रत्येक सामाजिक उपक्रमात सहभागी होणाऱ्या सागर चव्हाण यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### तुळजापूरच्या रोटरी क्लबच्यावतीने पुजारी नगरचा राजा गणेश मंडळाचा गौरव




**आरंभ मराठी । तुळजापूर**

रोटरी क्लब तुळजापूरच्या वतीने बुधवारी विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी तुळजाई नगरीतून गणपती मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे सर्वेक्षण करून तीन उत्कृष्ट गणपती मंडळ निवडण्यात आले होते. याप्रसंगी तुळजापूर रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत अपराध, सचिव संतोष लोखंडे, सैनिकी शाळेचे प्राचार्य वैजनाथ घोडके, पोद्दार स्कुलच्या मुख्याध्यापिका श्रुतिका रम्या, संजय जाधव आदींच्या हस्ते पुजारी नगरचा राजा सार्वजनिक गणपती मंडळास सन २०२४ चा उत्कृष्ठ गणेशोत्सव कार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. गणेश मंडळास सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मंडळाचे आधारस्तंभ गणेश पुजारी, जेष्ठ सदस्य किसन क्षीरसागर, तानाजी म्हेत्रे, सोमनाथ पुजारी, प्रतीक मोरे, डीजे सौरभ राऊत, अनिल आगलावे आदी सदस्य उपस्थित होते.

### लोहारा तालुक्यात कोतवालांना तहसील कार्यालय सोडवेना; कोतवालांनी सजावर थांबण्याची मागणी

**आरंभ मराठी । लोहारा**

शासनाने प्रत्येक सजावर तलाठ्यांच्या मदतीला व महसुली कामासाठी गावपातळीवर दिलेले बहुतांश कोतवाल लोहारा येथील तहसील कार्यालयातच थांबत आहेत. सजानिहाय नियुक्त्या कागदावर ठेवून येथेच त्यांच्याकडून काम करून घेण्यात येत आहे. याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे. तालुक्यातील बहुतांश ठिकाणी नेमणूक कोतवालांना तलाठी तहसील कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहेत. एकीकडे तलाठ्यांना खाजगी सहायक ठेवण्यास कायद्याने मनाई केली असली तरी ज्या सजावर कोतवालांची नियुक्ती आहे त्या ठिकाणी नेमणूक असणाऱ्या कोतवालांना लोहारा तहसील कार्यालयात अडवले जात असल्याने कोतवालांचेही चांगलेच फावले आहे. अधिकारी फक्त सह्यांचे धनी असून, बाकी सगळी कामे कोतवालच पार पाडत असल्याने हे अधिकारीही आरामात असतात. कोतवालांनी गावात विविध शासकीय योजनांची जनमाणसापर्यंत दवंडी देणे, नोटिसा देणे, कर वसुलीसाठी मदत करणे, दप्तर सांभाळणे हे कामे असताना कोतवाल मात्र, तहसील कार्यालयातच रमत आहेत.याबद्दल गावकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### ऐन निवडणुकीच्या काळात मुंबईतील २४५ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**आरंभ मराठी । मुंबई**

ऐन निवडणुकीच्या काळात मुंबई पोलीस दलातील २४५ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सलग आठ वर्षापेक्षा अधिक काळ मुंबईत सेवा केलेल्या पोलीस निरीक्षकांच्या निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. यापूर्वी देखील निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या होत्या. १११ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर मुंबईत अवघे ११ पोलीस निरीक्षक मुंबई बाहेरून आले. मुंबई पोलीस दलात पोलीस निरीक्षकाची मंजूर पदे १०३२ आहेत. मात्र ३१ जुलै पर्यंत कार्यरत ८८१ होते. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आता २४५ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळे निवडणुकीच्या कामावर होणार परिणाम होण्याची शक्यता आहे.

## दिवाळीचे रंग उजळले..



दिव्यांचा उत्सव दीपावलीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र धामधूम सुरु आहे. जेजुरीच्या जयाद्री कन्या परिवाराने पारंपरिक दिवाळीची सुरुवात दिव्यांच्या पूजनाने केली. दिवाळीच्या पहिल्या दिवसाच्या प्रारंभी पारंपरिक वेशभुषा करुन दीप पूजन करुन लोकरंगातील दिवाळीला उजाळा दिला. **छाया; विजयकुमार हरिश्चंद्रे, जेजुरी.**

### निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत १८७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

**आरंभ मराठी । मुंबई**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ही कामगिरी केली आहे. विविध ठिकाणी पोलीस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्य पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रूपये, इन्कमटॅक्स विभागाने सुमारे ६० कोटी रूपये, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रूपये यांचा प्रामुख्याने समावेश आहे. मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' ॲपवर तक्रार करता येते.

### उद्धव ठाकरेंना संपविण्याचे काम काँग्रेस करत आहे; चंद्रशेखर बावनकुळेंचे प्रत्युत्तर

**आरंभ मराठी । धाराशिव**

महायुतीतील पक्षात अंतर्गत मतभेद मोठ्या प्रमाणावर आहेत. महायुती एक विचित्र युती आहे. त्यामध्ये शिवसेना शिंदेंच्या पक्षाच्या जागावरती, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या जागांवरती भाजप आपले उमेदवार देत आहे, त्यांच्या ठिकाणी देखील निवडणूक लढवत आहे. महायुतीचा कोणता प्रवाभ नाही, किंवा त्यांचे अस्तित्व देखील नाही. भाजपने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला या निवडणुकीतून संपवलं असल्याचं काँग्रेस नेते रमेश चेन्निथला यांनी म्हटलं आहे.

यावर बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार करत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेस नेते रमेश चेन्निथला यांना महाराष्ट्राचा अभ्यास नाही. उद्धव ठाकरेंना संपविण्याचे काम काँग्रेस करत आहेत. आमच्यासोबत असताना उद्धव ठाकरेंना किमान १७१ वगैरे जाग मिळायच्या. मात्र आता ते जागावाटपात मागे पडत आहेत. किंबहुना ठाकरेंच्या जागेवर काँग्रेसचा उमेदवार लढत आहे. आम्ही मातोश्रीचा सन्मान करायचो. पण आज काँग्रेस ठाकरेंच्या जागांवर निवडणूक लढवत असल्याचे चित्र असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

भाजपकडून एकही मुस्लिम उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नाही, अशी टीका विरोधकांनी केली. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसला आमचा उलट प्रश्न आहे की, त्यांनी मुस्लिम परिवार आणि नेत्यांवर अन्याय केलाय. केवळ मतांसाठी वापर केलाय. विधानसभेपर्यंत नेतृत्व तयार करावे लागेल असे सांगून काँग्रेसने लोकसभेत मुस्लिम समाजाला भीती दाखवली आणि मते गोळा केली. भाजप मुस्लिम विरोधी आहे, असं काँग्रेसने भासवलं. काँग्रेसने मुस्लिम नेते असूनही उमेदवार दिले नाहीत, त्यांनी मुस्लिम समाजाशी बेईमानी केली, अशी टीकाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

राज्यातील काही मोजक्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील. अशा काही उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहेत. दरम्यान या बाबत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजितदादा सोबत बसून ठरवतील. तर पक्षांतर्गत बंडखोरी होते आहे. इच्छूक नेते नाराज आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपक्ष उमेदवार पाहायला मिळत आहेत. अजित पवार यांच्या सिंचन घोटाळा प्रकरणी मी बोलणं योग्य नाही, यावर दादा बोललेत. असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिक बोलणे टाळले आहे. तर भाजपने कमी जागा का लढल्या? असे विचारले असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुती आकड्यांसाठी निवडणूक लढत नाही. महायुतीचे सरकार आणण्यासाठी सर्व प्रयत्न करत आहेत. असेही ते म्हणाले.

# तुळजाई नगरीत आज होणार 'भेंडोळी उत्सव'

## ■ आगीच्या प्रचंड ज्वालेत अक्राळविक्राळ रुपात येणार कालभैरव
## ■ उत्तरेत काशी तर दक्षिणेत तुळजापूर येथेच साजरा केला जातो उत्सव

**आरंभ मराठी । तुळजापूर**

श्री तुळजाभवानी देवीच्या धार्मिक उत्सवपर्वात काळभैरवाचा भेंडोळी उत्सव महत्त्वपूर्ण मानला जातो. दिपावलीच्या अमावस्येला काळभैरवाचा भेंडोळी उत्सव उत्तरेत काशी आणि दक्षिणेत तुळजापूर येथेच साजरा केला जातो. कार्तिक महिन्यातील नरक चतुर्दशीला काळभैरव मंदिरातून निघणारी भेंडोळी ही प्रत्यक्ष युध्दाची अनुभूती देणारा उत्सव आहे. ज्यामध्ये आगीचा प्रचंड लोळ हा काळभैरव मंदिरापासून तुळजाभवानी मंदिरात आणला जातो. एका काठीला पलिते बांधुन ती पेटवुन निघालेली ती भव्य ज्वालायात्रा पाहताना थरकाप उडतो.




महाराष्ट्रात देवींची साडेतीन शक्तीपीठ मानली जातात. तुळजापूर निवासिनी आई श्री तुळजाभवानी माता तीर्थक्षेत्र आदिशक्तीपीठ म्हणून ओळखले जाते. कुलस्वामिनी, महिषासुर मर्दिनी, शक्तीदेवता, ऊर्जादायी दुर्गेच्या रूपाने अनेकांना प्रेरणा दिलेली आहे. तुळजाभवानी मंदीर परिसरात अनेकविध दैवतांचे वास्तव्य आहे. त्यात काळभैरव, टोळभैरव, उन्मत्तभैरव, बटभैरव, रक्तभैरव अशा एकूण अष्टभैरवांची मंदिरे आहेत.

देवांचे रक्षण करणारा रखवालदार म्हणजे कालभैरव हा या परिसराचा कोतवाल. त्याच्या अक्राळविक्राळ रूपाला अनुसरून त्याला रोजचा नैवेद्यही मांसाहाराचा असतो. शिवाय त्याच्या तोंडात गांजाची चिलीम पेटवुन दिली जाते. ही परंपरा आजही जोपासली जाते. तो वर्षांतुन एकदा अश्र्विन अमावस्येला तुळजाभवानी परिसराची पाहणी करायला निघतो. त्याचे फिरणे हे रात्रीचे असते. त्याला उजेड हवा म्हणुन हा भेंडोळी उत्सव आला असावा. कालभैरवनाथाचे दर्शन घेऊन भैरवनाथाचे पुजारी आणि त्यांचे सहकारी पोतने भेंडोळीची दिवसभर बांधणी करतात. नंतर भेंडोळी प्रज्वलित केली जाते. भैरोबाच्या नावानं चांगभलं आणि तुळजाभवानीचा उदो उदो करत शकडो तरुण भेंडोळी अंगावर घेत असतात. ही भेंडोळी घेऊन ते अरुंद गल्लीबोळातुन जातात. पण या भेंडोळीमुळे त्यांना कधीही इजा झाल्याचे उदाहरण नाही. मंदिरात आल्यावर देवीला पदस्पर्श करून ही मंदिर प्रदक्षिणा करून भेंडोळी वेशीबाहेर जाऊन विझवली जाते. मंदिरात भेंडोळी येताच भाविक पोत ओवाळणीसाठी देवीभक्तांची मांदियाळी सज्ज असते.

अश्विन अमावस्यादिवशी काळभैरवनाथचे तेल अभिषेक, श्रीफळ फोडणे, वड्याच्या माळा व नैवेद्य आदी विधी दिवसभर पार पडतात. संबळ, तिमडीसह पारंपरिक वाद्यांच्या तालासुरात काळभैरवनाथ,आई राजा उदो उदोच्या गजरात ऐतिहासिक भेंडोळी उत्सव पार पडतो. भेंडोळीचे दर्शन घेण्यासाठी तुळजाभवानी मंदिरासह महाद्वाररोडवर हजारोंच्या संख्येने भाविक गर्दी करतात. इथल्या प्रथा,परंपरा,रूढी,कुलधर्म कुलाचार पूजाविधीमध्ये वेगळेपणा आढळून येतो.

### भेंडोळी कशी बनवली जाते

भेंडोळी म्हणजे एका अकरा फूट लांब व साधारण सात ते आठ इंच जाडीच्या काठीला (दांड) मधोमध कच्च्या केळीचा अखंड घड बांधला जातो. नंतर संपूर्ण दांडावर केळीच्या खोडाचे जे साल गुंडाळतात नंतर चिंचेच्या झाडाच्या छोट्या छोट्या फांद्या त्याचा एक थर संपूर्ण दांडावर लावला जातो. शेवटी पुन्हा केळीच्या झाडाच्या सालीचा वापर करून ते बांधण्यासाठी अंबाड्याच्या झाडाची साल सोलून त्याला पीळ घातलेल्या दोरीचा (पड) वापर करतात. सर्व बांधणी झाल्यानंतर एका लोखंडी साखळदंडामध्ये सुती कपड्याचे पलिते ओवले जातात (तेलामध्ये बुडवून) व ती साखळी दांडाच्या मधोमध करकचून गच्च बांधली जाते व भेडोळी पूर्णतः तयार केली जाते. भेंडोळीची संपूर्ण बांधणी तयारी व भेंडोळी प्रज्वलन श्री काळभैरव मंदिराच्या समोर केली जाते.

भेंडोळी तयार करण्याचे काम श्री काळभैरव मंदिराचे मुख्य पुजारी यांच्यामार्फत केले जाते. हे सर्व कार्य करताना साधारणपणे पाच ते सहा तासाचा कालावधी लागतो. भेंडोळी तयार झाल्यानंतर श्री काळभैरव देवाची नित्य उपचार पूजा केली जाते व काळभैरव देवाची आरती अंगारा झाल्यानंतर काळभैरवाची पुजारी ज्या पंचारतीने काळभैरव देवास ओवाळीतात त्याच पंचारतीच्या सहाय्याने काळभैरवाचे पुजारी भेंडोळी प्रज्वलित केली जाते.

**-विश्वनाथ पुजारी (तुळजापूर)**
**काळभैरव मंदिराचे मुख्य पुजारी**